# अनुसुचित जाती व नव बौध्द घटकाच्या स्वंय सहाय्यता बचत गटांना मिनिट्रॅक्टर व त्याची उपसाधने यांचा पुरवठा करणे बाबत ची योजना (२०१५-१६)

**यवतमाळ दि.१४/०९/२०१५**

महाराष्ट्र शासनाचे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्र एसटीएस-२०१५/प्र.क्र.१०२/अजाक-१ मंत्रालय मुंबई ३२ दि. ३/९/२०१५ अन्वये अनुसुचित जाती व नव बौध्द घटकाच्या स्वंय सहाय्यता बचत गटांना ९० टक्के अनुदानावर ९ ते १८ अश्वशक्तीच्या मिनिट्रॅक्टर व त्याची उपसाधने कल्टीव्हेटर किंवा रोटाव्हेटर यांचा पुरवठा करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. या योजनेच्या अटी व शर्ती पुढील प्रमाणे आहेत.

१.स्वंय सहाय्यता बचत गटामध्ये किमान ८० टक्के सदस्य हे अनुसुचित जाती व नवबौध्द घटकातील असावेत. अर्जासोबत जातीचे प्रमाण पत्र जोडण्यात यावे.

२.अनुसुचित जाती व नवबौध्द घटकातील स्वंय सहायता बचत गटातील सदस्य महाराष्ट्र राज्याचे रहिवाशी असल्याबाबतची अधिवास प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करावे.

३. मिनिट्रॅक्टर व त्याची उपसाधने यांच्या खरेदीची कमाल मर्यादा रु ३.५० लाख इतकी राहील. स्वंयसहाय्यता बचत गटांनी वरील कमाल मर्यादेच्या रक्कमेच्या १० टक्के स्वहिस्सा भरल्यानंतर ९० टक्के (कमाल रु.३.१५ लाख) शासकिय अनुदान अनुज्ञेय राहिल.

४.या योजनेअंतर्गत स्वंय सहाय्यता बचत गटांना देण्यात आलेला मिनि ट्रॅक्टर विकता येणार नाही. अथवा सावकार किंवा अन्य व्यक्तीकडे गहाण ठेवता येणार नाही.याबाबत हमीपत्र स्वंयसहाय्यता बचत गटाकडुन सादर करावे.

५.ज्या स्वंयसहाय्यता बचत गटांना या योजने अंतर्गत मिनी ट्रॅक्टरचे वाटप करण्यात आले आहे. अशा स्वंय सहाय्यता बचत गटानी किमान १० वर्ष तो मिनिट्रॅक्टर उपयोगात आणावा त्याबाबत स्वत:हुन दरवर्षी १० मे पुर्वी सहाय्यक आयुक्त,समाज कल्याण यवतमाळ यांना मिनी ट्रॅक्टर विकला नसल्या बाबत प्रमाण पत्र सादर करावे.

६.ज्या लाभार्थ्यांना पॉवर टिलरचा लाभ दिला आहे. त्या लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ घेता येणार नाही. वरील प्रमाणे अटी व शर्तीची पुर्तता करीत असलेल्या यवतमाळ जिल्हातील इच्छुक स्वंय सहाय्यता बचत गटांनी त्यांचा अर्ज दि.३०/०९/२०१५ पर्यंत सहाय्यक आयुक्त,समाज कल्याण यवतमाळ डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन पोलीस दक्षता भवनच्या पाठीमागे यवतमाळ. येथे सुटटीचे दिवस वगळुन कार्यालयीन दिवशी दिलेल्या नमुण्यात अर्जातील नमुन्यात अर्जासोबत आवश्यक प्रमाणपत्र व दाखल्यासह सादर करावे असे आव्हान श्री. विजय एस. साळवे सहाय्यक आयुक्त,समाज कल्याण यवतमाळ.यांनी कळविले आहे.

सहाय्यक आयुक्त,
समाज कल्याण,यवतमाळ